**केंद्र शासनाच्या पाणलोट विकास कार्यक्रमाकरिता**
**सामाईक मार्गदर्शक सूचना -2008**
**राज्यस्तरीय नोडल एजंसीवर (SLNA)**
**आयुक्त कृषी यांची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याबाबत.......**

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास व जलसंधारण विभाग
**शासन निर्णय क्रमांक सामासू-२००९/प्र.क्र.७/जल-८,**
मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
**दिनांक : १६ मार्च, २०१२.**

**वाचा :**

शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक :
१) सामासू-१००८/प्र.क्र.४१/जल-२०, दि.२१ मे, २००८.
२) सामासू-१००८/प्र.क्र.६४/जल-२०, दि.१६ जुलै, २००८.
३) सामासू-२००९/प्र.क्र.०७/जल-८, दि.१७ एप्रिल,२००९.
४) सामासू-२००९/प्र.क्र.०७/जल-८, दि.१७ एप्रिल, २००९.
५) सामासू-२००९/प्र.क्र.०७/जल-८, दि.२९ ऑक्टोबर, २००९.
६) सामासू-२००९/प्र.क्र.०७/जल-८, दि. २८ डिसेंबर, २०१०.

**प्रस्तावना** :

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पर्जन्याधारीत क्षेत्र प्राधिकरणाने पाणलोट विकास कार्यक्रमाकरीता सामाईक मार्गदर्शक सूचना २००८ निर्गमित केल्या आहेत. सदर सूचना दिनांक १ एप्रिल, २००८ पासून लागू करण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचना परिच्छेद २५ च्या अनुषंगाने प्रधान सचिव (जलसंधारण) यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय नोडल एजन्सी (SLNA) स्थापन करण्यात आली असून त्यास वर नमूद दिनांक २१ मे, २००८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. या समितीची वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा या नावाने धर्मादाय आयुक्त यांच्याकडे संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणी करण्यात आली आहे. या शिवाय संदर्भाधिन क्रमांक २ वरील दिनांक १६ जुलै, २००८, संदर्भाधिन क्रमांक ३ वरील दिनांक १७ एप्रिल, २००९ संदर्भाधिन क्रमांक ५ वरील दिनांक २९ ऑक्टोबर, २००९ आणि संदर्भाधिन क्रमांक ६ वरील दिनांक २८ डिसेंबर २०१०च्या शासन निर्णयान्वये वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणेवर केंद्र शासन, केंद्र शासनाशी संबंधित संस्था, राज्यातील स्वयंसेवी संस्था, प्रशिक्षण संस्था यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच वर क्र. ४ येथे नमूद दि. १७ एप्रिल, २००९ च्या शासन निर्णयान्वये वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आली आहे.

२. संदर्भाधिन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांची वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात आली होती. सदर यंत्रणेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर कायम स्वरूपी नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

केंद्रीय भू संसाधन विभागाने गुजरात, भुज येथे पश्चिम प्रादेशिक विभागांतर्गत राज्यांचा आढावा घेतला असून त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाची प्रगती वाढवण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाची प्रगती वाढण्यासाठी सर्वकष उपाय योजना करणे आवश्यक आहे. सबब सदर योजनेच्या प्रगतीचा वेग वाढवण्याकरीता धोरणात्मक बाब म्हणून पुढील आदेशापर्यंत आयुक्त (कृषी) यांची मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा म्हणून नियुक्ती करण्यांस शासन मान्यता देत आहे. यापुढे संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन हे सदस्य वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा म्हणून कार्यरत राहतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक **२०१२०३१६०७०१३९३३९००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,

**(सुनील चव्हाण)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
मा.राज्यपाल यांचे खाजगी सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, जलसंधारण, यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, जलसंधारण, यांचे खाजगी सचिव
प्रमुख मार्गदर्शक, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती, राळेगण सिध्दी, ता.पारनेर, जि. अहमदनगर.
कार्याध्यक्ष, आदर्श गांव संकल्प व प्रकल्प समिती , शिवाजीनगर, पुणे.
मा. मुख्य सचिव यांचे सचिव
मा. प्रधान सचिव (जलसंधारण) तथा अध्यक्ष, वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा,
सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे,
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
प्रधान मुख्य वनसंरक्षक व महा संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
उपसंचालक, सामाजिक वनीकरण,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व उप जिल्हाधिकारी (रोहयो),
सर्व उपायुक्त (विकास),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
सर्व अधिक्षक कृषी अधिकारी,
सर्व सहसंचालक सामाजिक वनीकरण वृत्ते,
सर्व मुख्य वनसंरक्षक / सर्व उपवनसंरक्षक,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दी करीता),
महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा पुणे,
महासंचालक, कै.वसंतराव नाईक स्वावलंबन मिशन
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेचे सर्व सदस्य,

१. अपर मुख्य सचिव (वने),
२. अपर मुख्य सचिव (नियोजन),
३. प्रधान सचिव (कृषी),
४. प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता),
५. सचिव (पदुम),
६. सचिव (ग्राम विकास),
७. राज्य प्रमुख, एनआयसी, मुंबई,
८. आयुक्त, पशुसंवर्धन, पुणे,
९. प्रधान मुख्य वन सरंक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१०. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
११. संचालक, महाराष्ट्र सूदूर संवेदन केंद्र, नागपूर,
१२. मुख्य अभियंता व सह सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारं (स्थानिक स्तर),

सर्व सदस्य, महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषद,
विभागीय कृषी सहसंचालक, ठाणे, पुणे, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, लातूर.
सर्व मुख्य अभियंता, पाटबंधारे,
सर्व अधिक्षक अभियंता, पाटबंधारे,
सर्व अधिक्षक अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर)
महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
नियोजन विभाग / कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

निवड नस्ती- जल-८